| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा १०२/२०१८**<br>**वेदिका महादेव चौगले वगैरे**<br>**वि.**<br>**श्री. महादेव राजाराम चौगुले वगैरे** |

## नि. १४ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११-ड प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे.

३. सदर अर्जाचे कामी वादी यांनी दि. ०५.०१.२०२६ रोजी म्हणणे दाखल करून युक्तीवाद केला. मात्र त्यानंतर दि. १९.०१.२०२६, १६.०२.२०२६, २३.०३.२०२६, ०९.०४.२०२६ या तारखेदिवशी तसेच आज देखील प्रतिवादी क्र. २ यांना युक्तीवादाकरिता संधी देवूनही ते अथवा त्यांचे वकील हे हजर राहिलेले नाहीत. त्यामुळे सदर कामी प्रतिवादी क्र. २ यांचा अर्ज विचारात घेवून पुढे चालविण्यात आलेला आहे.

४. प्रतिवादी क्र.२ यांनी नि. १४ येथे दाखल केलेल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं. २ ही सहकारी संस्था असून सदर सहकारी संस्थेवर नियुक्त वसुली अधिकारी हे असून त्यांनी केलेल्या कारवाईबाबत अडथळा निर्माण करणेकरिता सदरच्या दावेची रचना केलेली आहे. प्रतिवादी नं. २ हे सहकार कायद्यातील तरतुदीप्रमाणे नियम १०७ प्रमाणे कारवाई करत असतात. वादी व प्रतिवादी नं. १ यांचेविरुद्ध सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुदरगड यांनी वसुली दाखले मंजूर केलेले आहेत. त्या वसुली दाखल्याची कारवाई सुरु असताना वादी यांनी खोटया व बोगस दावेची रचना केलेली आहे. सदरचा दावा हा कायद्यातील तरतुदीस बाधा निर्माण करणारा आहे. सहकार कायद्यातील कलम १६४ प्रमाणे सदरचा दावा दाखल करणेपूर्वी नोटीस देणे बंधनकारक असते. तसेच अशी कोणतीही नोटीस

वादी यांनी सदरचा दावा दाखल करणेपूर्वी दिलेली नाही. तसेच सहकार कायद्यातील कलम १५४ अन्वये सदर कारवाईस हरकत घेणेचा हक्क व अधिकार नियमित केलेला आहे. त्यामुळे पुन्हा या मे. कोर्टात सदरची तरतूद डावलून दावा दाखल करणे व त्या अनुषंगाने मनाई मागणी करणे हे कायद्यास इष्ट नाही. तसेच सदर दाव्यास सहकार कायदा कलम १६३ ची देखील बाधा येत आहे. सदर वादी व प्रतिवादी नं. १ यांचेविरुद्ध वसुली दाखले मंजूर झाले असलेकारणाने सदरचे दाखले हे कायद्याने हुकूमनामा म्हणून नियमित केले असल्यामुळे त्यास बाधा येईल असे या दाव्याचे कृत्य आहे. त्यामुळे सदर दावा नामंजूर करणे आवश्यक आहे.

५. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मुळातच प्रतिवादी क्र. २ यांनी दिलेला अर्ज हा खोटा व चुकीचा आहे. तसेच वादी हे शंकर पार्वती नागरी सह पत संस्थेचे सभासद नव्हते व नाहीत. तसेच सदरचा दावा हा स्थावर मिळकतीबाबत वाटपाचा आहे. तसेच वाटपाचे दावेचा निर्णय करणेचा पुर्ण अधिकार मे. कोर्टांना आहे. तसेच दावा मिळकत तबदील करू नये अशी कायम मनाई प्रतिवादींचे विरुद्ध मागील तारखेस आहे. तसेच सदरची दाद ही देणेचा पुर्ण अधिकार मे. कोर्टांना आहे. तसेच प्रतिवादींचा अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही. अंतिमतः वादीतर्फे वकील यांनी प्रतिवादी क्र.२ यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

६. प्रतिवादी क्र. २ यांचा अर्ज, वादी यांचे म्हणणे तसेच कागदपत्रांचे अवलोकन केले. तसेच वादी तर्फे वकील श्री. पी. ए. महाजन यांचा सखोल युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले, त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह मी पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अनु क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांचा दावा प्रस्तुत न्यायालयात चालण्यास पात्र आहे काय ? | **नकारार्थी.** |
| २. | वादी यांचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | ११ –ड प्रमाणे खारीज होणेस पात्र आहे काय ? | |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

७. **मुद्दा क्र. १ व २ करिता :–**

मुळातच प्रस्तुत ठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ याचे अवलोकन करणे गरजेचे ठरते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ पुढील प्रमाणे :–

*(अ) जेव्हा त्यातून काही वादकारण दिसून येत नसेल*

*(ब) जो अनुतोष मागितला असेल त्याचे मूल्य कमी दाखविले गेले असेल व न्यायालय निश्चित करील अशा मुदतीच्या आता न्यायालयाने त्याला मूल्यांकनात सुधारणा करण्यास सांगितले असता वादीने तसे करण्यात कसूर केली असेल.*

*(क) मागितलेल्या अनुतोषाचे योग्य मुल्यांकून करण्यात आले असले, तरी वादपत्र अपुऱ्या मूल्याचा मुद्रांक लावलेल्या कागदावर लिहिलेले असेल आणि न्यायालयनिश्चित करील अशा मुदीत न्यायालयाने त्याला आवश्यक तो मुद्रांकित कागद सादर करण्यास सांगितले असता, वादीने तसे करण्यात कसूर केली असेल.*

*(ड) वादपत्रात केलेल्या निवेदनावरुन दाव्याला एखाद्या कायद्यानुसार रोध आहे असे दिसत असेल.*

*(ई) ते दोन प्रतींत सादर केलेले नसेल.*

*(फ) वादीने नियम ९ च्या तरतुदींचे पालन केले नसेल.*

८. महाराष्ट्र सहकारी अधिनियम कलम १६४ पुढील प्रमाणे आहे :–

कलम १६४ :–

*"संस्थेविरुद्ध किंवा तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यांविरुद्ध अशा संस्थेचया कामकाजाशी संबंध असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणताही वाद त्याबाबत एक लेखी नोटीस निबंधकाच्या स्वाधीन केल्यानंतर किंवा त्यांच्या*

*कार्यालयात दिल्यानंतर दोन महिन्यांची मुदत संपेपर्यंत दाखल करता येणार नाही. अशा नोटिशीत वादाचे कारण, वादीचे नाव, वर्णन व राहण्यास ठिकाणी व तो मागत असलेला अनुतोष या गोष्टी नमूद करणे आणि वादपत्रात अशी नोटीस अशा रितीने स्वाधीन करण्यास किंवा देण्यात आली आहे या अर्थाचे निवेदन असणे आवश्यक आहे."*

९. मुळातच वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटप, हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता दाखल केल्याचे दिसून येत आहे. मुळातच दाव्याच्या अनुषंगाने तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अनुषंगाने वादी यांचा दावा व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे यांचे अवलोकन करणे अत्यंत गरजेचे ठरते.

१०. मुळातच वादी यांनी दाव्यात कथन केले आहे की, दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. १ चे वडील यांची वडिलार्जित मिळकत होती. सदर मिळकत अनुषंगाने वाटप झालेले नसल्यामुळे वादी व प्रतिवादी क्र. १ हे सामाईकात ज्वारी, हायब्रीड, सोयाबीन, ऊस, भुईमूग अशी पिके घेवून वहिवाट करत आहेत. तसेच सदर कामी प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीवर बेकायदेशीररित्या प्रतिवादी क्र. २ संस्थेचा बोजा निर्माण केलेला आहे. मुळातच सदरचे कर्ज हे वादी कुटुंबाने कधीही घेतलेले नव्हते.

११. तसेच सदर कामी वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये असलेल्या अ. क्र. २ येथे असलेल्या कागदपत्रामध्ये वादी क्र. ३ यांचे नाव व जामीनदार महादेव राजाराम चौगले असा मजकूर दिसून येत आहे. त्यामुळे एकंदरितच भलेही वादी हे प्रतिवादी क्र. २ यांच्या संस्थेचे सभासद नसतील तरी देखील वादी क्र. ३ या जामीनदार दिसून येत आहे. त्यामुळे एकंदरितच सहकार कायद्यातील तरतुदी नुसार वादी यांचा दावा या न्यायालयात चालण्यास पात्र नाही असे नम्रतापूर्वक वाटते.

१२. मुळातच महाराष्ट्र सहकारी अधिनियम मधील तरतुदी या प्रस्तुत प्रकरणास पुर्णपणे लागू होतात असे वाटते. तसेच सदर दाव्याच्या अनुषंगाने या न्यायालयास अधिकार क्षेत्राची

बाधा येत आहे असेही वाटते. तसेच प्रस्तुत दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाई व वाटपाकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरबाबत न्यायालयाला अधिकार क्षेत्र नसेल तर त्याबाबत कोणताही निर्णय घेता येणारा नाही.

१३. मुळातच दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार दावा हा योग्य त्या सक्षम न्यायालयात चालणेही तितकेच गरजेचे असते. तसेच वादी यांचा दावा व कागदपत्रे यांचे एकत्रितरित्या अवलोकन केले असता त्यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांचे विरुद्ध दाद मागितलेली आहे. त्यामुळे सदर दाद ही संस्थेविरुद्धच दिसून येते.

१४. तसेच वादी यांनी दाखल केलेल्या दाव्याच्या व कागदपत्रांच्या अनुषंगाने सदरचा दावा हा या न्यायालयास अधिकार क्षेत्र नसल्यामुळे चालण्यास पात्र नाही असे वाटते. त्यामुळे मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष मी नकारार्थी देत आहे. तसेच सदर दावा केवळ अधिकारक्षेत्र या कारणासाठी खारीज करता येणार नाही असे वाटते त्यामुळे मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष मी नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र . ३ :-</u>

१५. वरील सर्व कारणमिमांसेचा विचार करता वादी यांचा दावा योग्य त्या सक्षम कार्यक्षेत्र असलेल्या न्यायालयात पाठविणे गरजेचे आहे असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१. वादी यांनी त्यांचा दावा काढून घेऊन योग्य त्या सक्षम कार्यक्षेत्र असलेल्या न्यायालयात दाखल करावा असा आदेश पारीत करण्यात येत आहे.**

**२. वादी यांनी दि. ११.०६.२०२६ रोजी पर्यंत त्यांचा दावा काढून न घेतल्यास त्याबाबत योग्य ते न्यायोचित आदेश पारीत करणेत येईल.**

४/५/२६

पन्हाळा
दि. ०४.०५.२०२६

**के. दि. काकतकर**
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा.